शासकीय दूध योजनेमार्फत विक्री करण्यात येणाऱ्या दुधासाठी वितरक कमिशन इ. अनुषंगाने सुधारीत दर निश्चित करण्याबाबत.

महाराष्ट्र शासन
कृषी, पशुसंवर्धन, दुग्धव्यवसाय विकास व मत्स्यव्यवसाय विभाग
शासन निर्णय क्रमांकः एमएलके २०१३ /प्र.क्र. ९८/ पदुम ८
मंत्रालय विस्तार, मुंबई ४०० ०३२
तारीख: १५ ऑक्टोबर, २०१६

वाचा :

१) शासन निर्णय क्रमांक: कृषि व पदुम विभाग, क्रमांक एमएलके २०११/प्र.क्र.१९/पदुम ८, दि. ४.२.२०११
२) शासन निर्णय समक्रमांक दि.२१.११.२०१३
३) दि.१०.१०.२०१६ रोजीच्या प्रदत्त समितीच्या बैठकीचे इतिवृत्त

**प्रस्तावना :**

शासकीय दूध योजनेमार्फत खरेदी व विक्री करण्यात येणाऱ्या दुधाचे दर व संघ / संस्था यांचे कमिशन दर इ. निर्धारित करुन निर्णय घेण्यासाठी मा.मंत्रिमंडळाने मान्यता दिल्यानुसार दि.१३.८.२००९ च्या शासन निर्णयान्वये प्रधान सचिव (पदुम) यांच्या अध्यक्षतेखाली प्रदत्त समितीची स्थापना करण्यात आलेली आहे. प्रदत्त समितीच्या दिनांक १०.१०.२०१६ रोजी झालेल्या बैठकीत प्रदत्त समितीने केलेल्या शिफारशीनुसार दूध ठोक ग्राहकांना संदर्भ क्र.१ मधील शासन निर्णयानुसार देण्यात येणारे वितरक कमिशन रद्द करणे. तसेच शासकीय दूध योजनेमधून विक्री करण्यात येणाऱ्या दुधासाठी संदर्भ क्र. २ नुसार निश्चित केलेले वितरक कमिशनचे सुधारीत दर निश्चित करण्याबाबतचा प्रस्ताव शासनाच्या विचाराधीन होता.

**शासन निर्णय :**

दि.४.२.२०११ रोजीच्या शासन निर्णयान्वये शासकीय दूध योजनेमार्फत ठोक ग्राहकांना देण्यात येणारे कमिशन सदर ठोक ग्राहक हे वितरक नसून ग्राहक असल्याने रद्द करण्यात येत आहे. शासकीय दूध योजनेमार्फत वितरीत करण्यात येणाऱ्या दुधासाठी दूध वितरकांना त्यांनी केलेल्या वितरणाच्या अनुषंगाने टप्पानिहाय प्रति लिंटर दूध विक्री कमिशन खालीलप्रमाणे सुधारीत करण्यात येत आहे:-

| अ.क्र. | दूध विक्री परिमाण (लि.) | सुधारीत विक्री कमिशन (प्र.लि. रुपये) |
|---|---|---|
| १ | १ ते ५० | २.५० |
| २ | १ ते १०० | २.७५ |
| ३ | १ ते २०० | ३.०० |
| ४ | १ ते ३०० | ३.२५ |
| ५ | १ ते ३०० च्या वर | ३.५० |

हे आदेश दि. १.११.२०१६ पासून अंमलात येतील.

हे आदेश प्रदत्त समितीच्या दिनांक १०.१०.२०१६ च्या बैठकीत शिफारस केल्यानुसार निर्गमित करण्यात येत आहेत.

सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संकेताक २०१६१०१५१२१०३८४४०१ असा आहे. हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने.

Ravindra Vasantrao Gurav

(र.व.गुरव)
उप सचिव, महाराष्ट्र शासन

प्रत,

१. मा.मुख्यमंत्री यांचे प्रधान सचिव
२. मा.उपमुख्यमंत्री यांचे सचिव
३. मा.(सर्व) मंत्री / राज्यमंत्री यांचे खाजगी सचिव / स्वीय सहायक
४. प्रधान सचिव (वित्त), मंत्रालय, मुंबई
५. सचिव (सहकार), मंत्रालय, मुंबई
६. आयुक्त, दुग्धव्यवसाय विकास, महाराष्ट्र राज्य, वरळी, मुंबई
७. सहकार आयुक्त व निबंधक, सहकारी संस्था, महाराष्ट्र राज्य, पुणे
८. आयुक्त, पशुसंवर्धन, महाराष्ट्र राज्य, पुणे
९. सर्व विभागीय आयुक्त
१०. सर्व जिल्हाधिकारी
११. व्यवस्थापकीय संचालक, महाराष्ट्र राज्य सहकारी दूध महासंघ मर्या., गोरेगांव, मुंबई
१२. महाव्यवस्थापक, बृहन्मुंबई दूध योजना, वरळी, मुंबई ४००० १८
१३. प्रादेशिक दुग्धव्यवसाय विकास अधिकारी, पुणे/ नागपूर / मुंबई / औरंगाबाद /नाशिक / अमरावती
१४. सर्व जिल्हा दुग्धविकास अधिकारी
१५. सर्व महाव्यवस्थापक / व्यवस्थापक, शासकीय दूध योजना
१६. महालेखापाल १ /२, महाराष्ट्र (लेखा व अनुज्ञेयता / लेखा परीक्षा) मुंबई / नागपूर
१७. अधिदान व लेखापरीक्षा अधिकारी, मुंबई
१८. निवासी लेखा अधिकारी, मुंबई
१९. सर्व जिल्हा कोषागार अधिकारी
२०. वित्त विभाग (व्यय २)
२१. सर्व कार्यासने (पदुम विभाग)
२२. निवडनस्ती.